सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३,
यांचे कार्यालय, मुंबई.
शैलेंद्र नगर जवळ, वृंदावन रोड, दहिसर (पुर्व), मुंबई-४०००६८.
दूरध्वनी क्र. ०२२-२८२८३८८९
E-mail: dcpnorthzone3-mum@mahapolice.gov.in

प्रेस नोट

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई

विषय :- समतानगर व कुरार पोलीस ठाणे हद्दीतील इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू, ड्रग्स विक्रेता, सराईत गुन्हेगार व त्यांच्या साथीदारांविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई

समतानगर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १२/०९/२०२६ रोजी रात्री ०३.०० वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र बिर्याणी सेंटर, हनुमाननगर, कांदिवली (पूर्व) येथे झालेल्या वादातून आरोपी इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू व त्याच्या साथीदारांनी अनमोल डेअरीजवळ फिर्यादी व त्यांच्या मित्रांना संगनमताने धारदार चाकूचा धाक दाखवून, दगड व लाकडी बांबूने मारहाण करून गंभीर दुखापत केली व जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी समतानगर पोलीस ठाणे गु.र.क्र. १२५८/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम १०९(१), ११८(२), ११८(१), ११५(२), १८९(२), १८९(४), १९०, १९१(२), १९१(३), ३५१(२), ३५२ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७, १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी :- नमूद गुन्ह्यातील मुख्य आरोपी इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू याच्याविरुद्ध यापूर्वी दरोड्याची तयारी करणे, दरोड्याच्या उद्देशाने एकत्र जमणे, खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, मारहाण करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे, महिलांविरुद्ध गुन्हे करणे, प्राणघातक शस्त्रांचा वापर करणे, अमली पदार्थ विक्री करणे तसेच प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करणे अशा विविध स्वरूपाचे एकूण १७ गुन्हे समतानगर व कुरार पोलीस येथे दाखल आहेत. याशिवाय, नमूद गुन्ह्यातील इतर आरोपींचीही गुन्हेगारी पार्श्वभूमी असून, आरोपी राज रवी शर्मा उर्फ कालू याच्याविरुद्ध ०७ गुन्हे, जितेश गंगाप्रसाद राजपूत याच्याविरुद्ध ०२ गुन्हे, केतन पांडुरंग गमरे याच्याविरुद्ध ०२ गुन्हे व राधा गंगाप्रसाद राजपूत हिच्याविरुद्ध ०२ गुन्हे यापूर्वी दाखल आहेत. तसेच, सदर गुन्ह्यात विधिसंघर्षग्रस्त बालक याचाही सहभाग निष्पन्न झाला असून, त्याच्याविरुद्ध यापूर्वी ०२ गुन्हे दाखल आहेत.

संघटित गुन्हेगारी टोळीची कार्यपद्धती :- नमूद गुन्ह्यातील मुख्य आरोपी इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू याने स्वत:ची संघटित गुन्हेगारी टोळी स्थापन केली असून, तो सदर टोळीचा प्रमुख म्हणून कार्यरत आहे. टोळीतील विविध सदस्यांच्या मदतीने त्याने समतानगर व कुरार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे त्याच्या व टोळीच्या दहशतीमुळे नागरिक त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यास पुढे येण्यास धजावत नाहीत. तसेच, सदर टोळीमार्फत परिसरात अमली पदार्थांची विक्री करून बेकायदेशीर मार्गाने आर्थिक लाभ मिळविण्यात येत आहे. अशा प्रकारे, टोळीच्या माध्यमातून आपले गुन्हेगारी वर्चस्व कायम राखण्यासाठी मुख्य आरोपी हा टोळीतील सदस्यांच्या मदतीने सातत्याने विविध बेकायदेशीर कृत्ये करीत आहे.

अटक आरोपीचे नाव :-

१) राज रवि शर्मा उर्फ कालू वय २७ वर्षे, २) जितेश गंगाप्रसाद राजपुत व ४९ वर्षे, ३) राधा गंगाप्रसाद

राजपूत वय ४१ वर्षे, अ.क्र. १ ते ३ राहणार रूम नं. ४३३ सर्वोदय वाडी, पाल राजेंद्र स्कुल जवळ, हनुमान नगर, कांदिवली पुर्व, मुंबई

मोक्का कायद्यान्वये कारवाई :- नमूद गुन्ह्यातील मुख्य आरोपी इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू व त्याच्या साथीदारांविरुद्ध समतानगर पोलीस ठाणे गु.र.क्र. १२५८/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम १०९(१), ११८(२), ११८(१), ११५(२), १८९(२), १८९(४), १९०, १९१(२), १९१(३), ३५१(२), ३५२ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७, १३५ दाखल गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२) व ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्यात आला. सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री कैलास बर्वे करीत आहेत.

सदर गुन्ह्याच्या तपसात मा. श्री. शशिकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. श्री. गजानन शिवलिंग राजमाने, पोलीस उपआयुक्त, उत्तर परिमंडळ-०३, मा. श्री. कैलास बर्वे, सहाय्यक पोलीस आयुक्त, समतानगर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयवंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजितसिंग राजपुत, सपोनि राऊत, सपोनि रामेकर, पोउनि गोकुळ पाटील, पोह ९६००२५/पाटील, पोह ९८०२९०/खडपकर, पोशि १११५४९/राजपुत यांनी अथक परिश्रम घेतले.

.



टोळी प्रमुख
इम्तियाज हुसेन सय्यद
उर्फ टिपू



राज रवि शर्मा उर्फ
कालू



जितेश गंगाप्रसाद
राजपुत



केतन पांडुरंग गमरे



राधा गंगाप्रसाद राजपूत